सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेतील सहयोगी सभासदांच्या सहभागाबाबत.

## महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन आदेश क्रमांक सगृयो-२००६/प्र.क्र.१/१४-स,
शिबीर कार्यालय, नागपूर
दिनांक :- ०५ नोव्हेंबर, २००६

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २(१९) व त्या अंतर्गतचे नियम १९६१ च्या नियम ३२ व ३३ अन्वये **"सभासद"** या व्याख्येत सहयोगी सभासदाचा अंतर्भाव आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७५ अन्वये सभासदांना सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेला हजर राहण्याचे अधिकार आहे. सभासदाच्या व्याख्येत सहयोगी सभासद अंतर्भूत असल्यामुळे सहयोगी सभासदांनाही सर्वसाधारण सभेला हजर राहण्यास कायदेशिर प्रत्यवाय नाही. मात्र अशा सहयोगी सभासदांनी मत देण्याच्या अधिकारावर उक्त अधिनियमाच्या कलम २७ व नियम २० अन्वये बंधन घालण्यात आलेले आहे. सहयोगी सभासदास मत देण्याचा अधिकार केवळ मूळ सभासदांच्या अनुपस्थितीत सदर अधिनियमाच्या कलम २७(२) अन्वये प्राप्त होतो. तसेच, सहयोगी सभासदांना मतदानशिवाय इतर अधिकारही उक्त अधिनियमाच्या कलम २७(८) अन्वये सहकारी संस्थेच्या उपविधीत तरतुद असल्यास प्राप्त होवू शकतात.

C & R
16 DEC 2006

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाकडून शासनाकडे मागणी करण्यात आली आहे की, सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद त्यांच्या वार्धक्यामुळे किंवा अपंगत्वामुळे अथवा आजारपणामुळे सर्वसाधारण सभेला हजर राहून सर्वसाधारण सभेच्या कामकाजात सहभागी होवू शकत नाहीत किंवा आपले मत प्रभावीपणे मांडू शकत नाहीत, अशा वेळी त्यांच्या समवेत त्यांच्या सहयोगी सभासद सर्वसाधारण सभेला हजर राहिल्यास मूळ सभासदाला सहयोगी सभासदामार्फत आपले मत मांडण्यास व सर्वसाधारण सभेमध्ये चाललेले कामकाज व्यवस्थितपणे जाणून घेण्यास मदत होईल. मात्र सर्वसाधारण सभेत मतदानाची गरज भासल्यास कायद्यानुसार मूळ सभासद मतदान करेल किंवा तो गैरहजर असल्यासच सहयोगी सभासद मतदान करु शकेल व सभासदाची वरील मागणी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांच्या व्यापक हितासाठी योग्य असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब, या संदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम ७९ अ अन्वये शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जनहितार्थ शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सहयोगी सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेत (ज्यात संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचाही अंतर्भाव होईल) हजर राहण्यास शासन खालील अटींवर परवानगी देत आहे.

२. मूळ सभासदाच्या अनुपस्थितीत सहयोगी सभासद सर्वसाधारण सभेस हजर राहिल्यास अशा सहयोगी सभासदाला सर्वसाधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येईल व मूळ सभासदाने प्राधिकृत केले असल्यास त्यास मतदानही करता येईल.

३. सर्वसाधारण सभेतील कोणत्याही बाबीसंदर्भात मूळ सभासद व सहयोगी सभासद यांच्यामध्ये मतभिन्नता असल्यास मूळ सभासदाचे म्हणणे अधिकृत ठरविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( जे. पी. डांगे )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत अग्रेषित --

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
२) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
४) प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहाय्यक.
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
६) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)
७) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
८) निवड संग्रह (१४-स)